नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २२/०१/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करून जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक एकुण २८,१०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त

दिनांक २०/०१/२०२२ रोजी ठाणेदार सपोनि श्री अमितकुमार आत्राम, पोलिस स्टेशन केळवद हे पो.स्टे. स्टाफसह पो.स्टे. परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, टाटा कन्टेनर क्र. यु.पी— २१/ बी.एन— ८३१० मध्ये काही लोक अवैधरित्या गोवंश जातीच्या जनावरांची वाहतुक कत्तलीचे उद्देशाने करीत आहे. अशा खबरेवरून सपोनि श्री अमितकुमार आत्राम हे पो.स्टे केळवद स्टाफसह बीहाडा फाटयाजवळ नाकाबंदी लावली. दरम्यान स्टाफ पांढुर्णा ते नागपूर रोडवर बॅरीकेड्स लावुन नाकाबंदीकरीत असतांना सायंकाळी ०७:०० वा. चे सुमारास एक टाटा कन्टेनर क्र. यु.पी— २१/ बी.एन— ८३१० वाहन अतिश्य भरधाव वेगाने येतांना दिसले. तेव्हा सदर कन्टेनर वाहनाचे चालकास पोलिसाने वाहन थांबविण्याचा इशारा ईशारा करून सुद्धा वाहन न थांबवीता आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे रोडवर येणा—या जाणा—या लोकांचे जिवीतास धोका होईल या पध्दतीने वाहण चेकींग करीता लावलेले बॅरीकेट्स उडवुन नुकसान करुन पळुन गेला. त्यादरम्यान पोलिस स्टाफने कंटेनरचा पाठलाग करीत असतांना कंटेनर मध्ये बिघाड झाल्याने कळमेश्वर रोडवर मौजा वाघोडा येथे वाहन उभे करुन वाहन चालक व वाहक पळुन जात असतांना त्या दोघांना स्टाफचे मदतीने पकडण्याचा प्रयत्न करीत असतांना कंटेनर चा चालक व वाहक यांनी यातील फिर्यादी व पोलीस स्टाफ सह लांबाझोंबी केली. आरोपी क्र १. मोहम्मद इरशाद बाबु खान वय ३३ वर्ष रा . निवालीया पोस्ट पोलायखुर्द ता. पोलायकला जि. शाजापुर (म.प्र) (वाहक) याने पळुन जाण्याकरीता फिर्यादी व पोलीस स्टाफ सोबत लांबाझोंबी करून फिर्यादी नापोशि रविंद्र चटप यांचे पायावर लाथ मारून फिर्यादीस जखमी केले. त्यावेळी पोलीस स्टाफ व अधिकारी यांच्या मदतीने नमुद दोन्ही आरोपी क्र. १ व २) मोहम्मद शकील लैयीक खान, वय २८ वर्ष, रा. भौरासा त. बैरसीया जि. भोपाल (म.प्र) (वाहन चालक) यांना ताब्यात घेण्यात आले. यातील आरोपीतांनी संगणमत करून स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी महाराष्ट्र राज्यात गौवंश हत्या बंदी आहे. हे माहीत असतांना सुध्दा टाटा कन्टेनर क्र. यु.पी— २१/बी.एन— ८३१० किमती २०,००,००० / —रुपये या वाहनामध्ये ७० नग गौवंश जनावरे एकुण कि. ८,१०,०००/—रू. चा मुद्देमाल अत्यंत क्रूर व निर्दयतेने डांबुन आखुड दोरीने बांधुन त्यांना चारा पाण्याची सोय न करता कोबुंन दाटीवाटीने अपुऱ्या जागेत ठेवुन कत्तली करीता वाहतुक करतांना तसेच ०२ गौवंश यांच्या मरणास कारणीभुत ठरले.

सदर प्रकरणी सरतर्फे नापोशि रविंद्र चटप पो.स्टे.केळवद यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे.केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३५३,३३२,२७९,४२९,४२७,३४ भादवी सहकलम ११(१) (घ) (ड) (च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. १९६० सहकलम ५ (अ), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनीयम १९९५ सह कलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनीयम १९५१, सहकलम १८४,१३४/ १७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री अमितकुमार आत्राम मो.नं. ९४०५१९४३१७ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. विजयकुमार मगर, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्रीमती पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनात ठाणेदार सपोनि श्री अमितकुमार आत्राम, पोउपनि श्री उमेश नासरे, पोहवा गुणेश्वर डाखोळे, नापोशी रविंद्र चटप, पोशी सचिन येळकर, श्रीधर कुलकर्णी, धोंडुतात्या देवकते व पंकज कोहाड यांनी केलेली आहे.







पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर